## प्रकरण तिसरे

## प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील अभिव्यक्ती अन्य विशेष

## प्रकरण तिसरे

## प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील अभिव्यक्ती अन्य विषय

या आधीच्या प्रकरणात आपण प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील आशयसूत्रांचा विचार केला. आता या प्रकरणात त्यांच्या कथेतील अभिव्यक्तीचा व विशेषांचा आपण या प्रकरणात विचार करणार आहोत.

प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील कथानकरचना, व्यक्तीचित्रण, प्रसंगचित्रण भाषाशैली आणि अन्य विशेष या अनुषंगाने येथे त्यांच्या कथेचा विचार करावा लागतो. ग्रामीण जीवनातील सुख दुःखाचे आणि एकंदर तेथील परिस्थितीचे चित्रण त्यांच्या कथेमध्ये दिसून येते. त्यांच्या कथेतील विषय हे नेहमीच्या कृषी जीवनाशी निगडीत असे आहेत. परंतु त्यांचेही त्यांनी सुक्ष्मपणे चित्रण केलेले असल्याने त्यांच्या कथा या स्थुलाकडून सुक्ष्माकडे वाटचाल करतात.

त्यांच्या कथातील अभिव्यक्तींचा अभ्यास करताना त्यांच्या कथेतील व्यक्तींच्या मनाचा जसा त्यामध्ये उल्लेख येतो तसाच त्या व्यक्तींच्या दुःखाचा परिस्थितीचा उल्लेख येतो. समाजव्यवस्थेने लादलेले दुःख त्या निमूटपणे सहन करताना दिसतात. विदर्भातील शेती ही प्रामुख्याने कापूस पिकविणारी अशी आहे. त्यामुळे त्यांच्या कथेतील प्रसंग हे त्या शेती जीवनाशी निगडीत असेच आहेत.

प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण जीवन अनुभवलेले आहे आणि एकूणच त्या जीवनाशी त्या समरस झालेल्या आहेत. हे त्यांच्या

कथेतील वातावरणामुळे लक्षात येते. एकंदर प्रतिमा इंगोले यांची कथाही व-हाडी लोकजीवन संस्कृती, अस्मिता यावर प्रखर प्रकाश टाकणारी दर्जेदार अशी कथा आहे. तेव्हा हे लोकजीवन त्यांची संस्कृती, अस्मिता ही त्यांच्या कथांतून कशी अभिव्यक्त होते.

कथानक रचना :

प्रतिमा इंगोले यांच्या कथेच्या कथानक रचनेचा विचार करता त्यांच्या कथांची सुरवात कशी नाटयात्मक घटना प्रसंगाने, तर निसर्ग-वर्णनाने, तर कधी लोककहाणीच्या स्वरूपात कथांची सुरुवात होते. तर कधी पुर्वकथन पध्दतीने (फ्लॅश बॅक) होते आणि कथेचा आरंभ, मध्य, शेवट ही आशयानुरुप झालेला दिसून येतो. "मोंड" ही कथा प्रतिमा इंगोले यांच्या कथानक रचनाची सर्व वैशिष्टये या कथेत एकवटली आहे. कथेची सुरवातच अशी घडविली आहे की, पुढच्या नाटयात्मक घटनेची चाहुलच सुरुवातीपासून लागते आणि या कथेतील वेगाने विकसित होणा-या प्रसंगामुळे कथेतील लय शेवटपर्यंत पकडली आहे. कथानक नाटयात्मक घटनेमुळे पुढे सरकत राहते. कथेची सुरवात अशी आहे. "रोजच्यावानी गोकूचीनं रंधावन आवरलं, भाकर पाल-वात ठुली सिच्यावर करोळकुला आन शिदोरी बांदुन ते दारात आली. पन आज काउन काय मालूम, पन तिले जस वावरात जावाच वाटेना।"[१] या सुरुवातीप्रमाणेच पुढे घटना घडत जातात. या कथेचा शेवटही तसा उत्कंटापूर्वक आहे. गोकुळहीचं पुढं काय होईल अशा आशयाचा या घटनेचा शेवट कथेच्या यशस्वीतेचा दाखला आहे. "दिठ","कोळली ठन्न", "डोयाचा सेच", "संपन", (लेक मुईची) इत्यादी कथांची सुरुवात मध्य, शेवट आणि परिणामकारकता एकच आहे. एकचएक घटना क्रमाने सरकत आहे की, जणू एखादी कहाणी सांगावी तशी.

"लेक मुईची" कथानकरचनेच्या दृष्टीने काहीसी वेगळी जाणावणारी कथा आहे. कथेची सुरुवात मध्य आणिशेवट याचा कथेवर एकच एक परिणाम होत नाही. कथा विष्कळीत स्वरुपात असून एकत्र आणण्याचा प्रयत्न दिसतो. अनेक प्रसंगाने एकत्र ओवलेली अशी गोष्ट वाटते.

कथानक रचनेच्या दृष्टीने खालील कथांमध्ये कथानकरचनेचा धागा एकच असल्याचे जाणावते. "अकसिदीचे दाने" या कथेची सुरुवात पहा - "उमरावतीच्या डफरीन दावख्यान्यात माया पोरीच्या उस्तासी बसेल होतो. पोरगी आझूनई सुध्दीवर आलीच नोती. डागतरीनच्या तीन खेपा झाल्या होत्या. पाटलीनचे नाकडोये लव्हलव्ह लाल झालते." [२] तर "दारका" या कथेची सुरुवातही पाहण्यासारखी आहे - " गाय वाड्याची झापी उघडताच त्यानं अंधर पाऊलं टाकली, तशी त्याची नंदी, मुंदीची जोडी माना फिरु फिरु त्याच्या इकडे पायाले लागली. मांग त्याच्या त्याचे तीनही पोरं आले. येता बरबर त्याईनं गायवाला ति-हा दनान्‌न टाकला. एकानं पानी भटली थाली आनली होती. त एकानं पोथीच्या पानाले हयद आन्‌ लोनी लावून आनलं होतं" [३] अशी "सोन्याचा गोफ", "पाग फिटला", "चाळोली", "सर्पा" या कथांची सुरुवात आहे. या कथामधील कथानकरचना एकचएक परिणाम करणा-या आहेत. कथेची सुरुवात ही घडणा-या घटनेचा सुचक असतात. त्यानंतर कथा सलग एकसुत्रीपणाने चढत्या क्रमाने कथन शेवटी आहे या स्थितीत असते. उदा. "गढी" या कथेतील कथानकाची सुरुवात त्यांच्या तीनही कथासंग्रहातील कथांपेक्षा वेगळी आहे आणि म्हणूनच ती चटकन लक्षात येते ती निसर्ग वर्णनामुळे

हे वर्णन पाहण्यासारखे आहे. त्याची सुरुवात या प्रमाणे "सातपुड्याच्या दुपट्यावर ते लहानुलं गाव वसेल व्हतं गावभवताल सातपुड्याची झालर व्हती. गावसेजून वाननदी झुयमूय वायत व्हती. वायता वायता या गावात कायचीच वान नायी, असं ते सांगत व्हती. गावची जमीन कायीशार, लोन्यावानी मऊ, तिच्यातून दरसाल दान्याचा पूर ये. आन वाननदी ऊर भरुभरु गावाचं कवतीक पाहे. या नदीच्या कराळी एक वडाचं झाड फुटू पायत व्हतं. डोक्स्या-एवढं झालं व्हतं. त्याचा कव्वा कव्वा हिरवटपणा गावातल्याइले भूलवू पायत व्हता. पन उनाये-पावसाचे झेलता-झेलता तो गाब्द झाला व्हता. वाळा पडल्यानं पांदढी पांदढी गढी बोळक्या बामनीनीवानी उ उघडी पडली व्हती." [४] या निसर्ग वर्णनामुळे जणू कथेच्या पुढचा प्रतिकात्मक रुप म्हणून उपयोग केला आहे आणि कथानकाला सुरुवात होते. बापू गुरुजींच्यावर आधारित या कथेचा शेवटही असाच केलेला आहे. कथेच्या सुरुवातीच्या बहदार निसर्ग आणि त्याच निसर्गाला शेवटी वणव्याच आलंल रुप कथानकाची संपूर्ण सुचकता देते असेच म्हणावे लागेल. "लोकावानी" कथेच्या सुरुवातीपासूनच सूचकता निर्माण केलेली आहे. "कुर•••कुर••• पायतानाचा आवाज येताच बरबर तिनं वयखलं का बुवाचीच सवारी आणि हाये म्हनून ••••• तशीच तिच्यावाल्या जीवानं झळझळून झाडनी देल्ली, अंदर आल्यावर बुवा कोणता घोर करते काय मालुम ?" [५] या सुचकतेवरुन कथानकाची रचना झालेली आहे. आणि त्याचा शेवट परिणाम जाणवतो तो त्या व्यक्तीच्या वेदनेने "कळी" ही कथाही उपरोक्त कथेप्रमाणेच कथानकाची रचना केलेली आहे.

"बि-हाड" या कथेची रचना व्यक्तीच्या दु:खाची कहाणी आहे. कथानकाची सुरुवात या प्रमाणे "उदास पंचकुला डॉक्टरांच्या कंपाऊंडचं

फाटक उघडून आत आली तिच्या डोक्यावर तरटाच्या पोत्यात ति तिच्या संसाराची भांडी होती. डोक्यावरचं ओझं कुठ ठेवाव.... म्हणून पंचफुला सार आवार नजरेनं बुडालू लागली."[६] कथेच्या मध्यामध्येही ती निवा-यासाठी धडपडत आहे आणि शेवटही निवा-यासाठी एकाग्र आहे. अशा प्रकारे कथानकातून एकच एक परिणाम जाणवतो. अशा प्रकारची कथानकरचना त्यांच्या त्यांच्या "पेटरणारे हात", "भिकारी", "भोवाडा", "इनवासे" इत्यादी कथांचे आहे.

"सुगरनचा खोपा", "घुईधानी", "माकलती" (सुगरनचा खोपा") या कथांची रचनाएकच आहे. सुरुवातीपासून चढत्याक्रमाणे घडत गा चाललेल्या या कथांची रचना आहे. आणि या कथानकातून एकचएक परिणाम घडून येतो. शेवटही असाच अपेक्षित असाच असतो. तर प्रतिमा इंगाले यांच्या ब-याचशा कथांची सुरुवात लोककहाणी प्रमाणे होते. त्यामुळे कथांच्या आशयाला एक अभिरुची प्राप्त होते. उदा. "डुबतीची पावलं" (लेक भुईची) या कथेची सुरुवातच अशी आहे की, एखादी गोष्ट सांगितल्या सारखी आहे. त्यांच्या कथेची सुरुवात अशी आहे, "मायबापहो एक गोठ आहे ! तशी तुमच्या गावाची ! गोठ आहे ! जनकरावांची ! जनकराव आमच्या गावचा ! तूमी खेड्यात राहत असान तूमच्याही गावची !"[७] अशा प्रकारे कथानकाला सुरुवात होते आणि कथा जनकरावांची कथापुढे सरकत राहते आणि याच कथेचा शेवटही पाहण्यासारखा आहे. आणि शेवटही गोष्ट झाली की, जसा होतो तसाच झालेला आहे. कथेचा शेवट याप्रमाणे आहे" तर मायबापहो ! अशी झाली गोठ ! सीताबाईचे गोठ ! डुबतीच्या पावलाची गोठ ! पन तुमी वाईट वाटून घिवू नोका. घटकाभर गोठ आयका लागतेचे गोठी गोठीनं मन रमते घटकाभर

जीवाले बरं लागते. पन बातच गोठ भुलुन जा लागत असते. ते मनाला लावून घ्याची नसते. येच्यासाठीच गोठ असते.। [8] कथेचा शेवट एवढया विस्ताराने पाहिल्यावर कथानकाची सुरुवात आणि शेवट यावरुन त्यांच्या या कथेलागोष्टीचे रुप प्राप्त झाले आहे. असे म्हणावे लागेल. "परामाची लेक" (लेक भुईची) या कथेची सुरुवात कथेच्या शेवटच्या घटनेपासून सुरु होते आणि तिचा मागोवा घ्यावा अशाच पध्दतीने कथेची मांडणी केलेली आहे. केसरच्या द दु:खाची सुरुवातच अशा घटनांने होते हे केसरच आपल्याला सांगत आहे. यशी आहे आणि केसरला भोगाव्या लागणाऱ्या दु:खाची हकिकत या कथेत मांडली आहे. त्यांची सुरुवातच पाहिली की समजून येते. देराच्या लग्नापासून केसरले झाले बात गमेना धावू धावू तिले तिले मायचीच याद ये ।। या कथेत केसरच्या एकूणच दु:खाचे वर्णन करुन शेवटही असाच परिणामकारकपणे केला आहे. "मायमक्का" (लेक भुईची) या नवरातराचा घट बसायचा दिस आला की, मले पांढया आजीची आठोन झालीच". या नवरात्रीच्या उत्सवाच्या निमित्ताने आजीची आठवण येते आणि आजी कशी होती आणि तिच्या जीवनातील विविध सुखदु:खाचे प्रसंग चित्रित करुन सांगितले आहेत आणि कथेचा शेवटही असाच होतो. "आन माया डोयासामने ढब्बु पयस्या एवढं कुकूलावेला आजी दिसालो लागे... दसऱ्याच्या दितीस तिचं दसवं झालं. आन आजीचं सानं झालं. आमची आजी गेली आन एक खरी माय आन गावाची माय गेली. तिच्या मोठी तेवडया उरल्या तिच्यासंग वाळ्यांचं खरखुरं वयभरनई गेलं" (पृ.१०)

"वटी" (लेक भुईची) या कथेतील कथानकरचना व्यक्तीच्या दु:खाभोवती फिरते. त्यामुळे ही कथा व्यक्तिकेंद्रित झाली आहे. कथेच्या मध्यातील भागला जोरकसपणा आणण्याचे कस म्हणूण

त्या व्यक्तीच्या जीवनाचा पूर्व इतिहास थोडक्यात कथन करून कथानकाला दुजोरा दिला आहे. पुंजी ही सासरावरून आल्यानंतर सुरुवात होऊन मध्यंतरी तिच्या जीवनातील घडलेल्या परिवर्तनाचे आणि शेवटी ती त्याच जागी बसली आहे हा कथेचा शेवट एखाद्या चलचित्राप्रमाणे घडविला आहे. वटीसाठी भीक मागणाऱ्या पुंजी मागिणीची कथा न उरता ग्रामीण विधवा स्त्रियांना त्यातल्या त्यात अस्पृश्य स्त्रियांना ज्या यातना भोगाव्या लागतात त्याचे चित्रण पुंजीला केंद्रस्थानी ठेवून केलेले आहे. "पयस्याची मेख" (लेक भुईंची ) या कथेमध्ये ग्रामीण भागातील स्त्रिया एकत्र येण्याचे ठिकाण म्हणजे नदीच्या ठिकाणी धुनं धुण्यासाठीच्या निमित्ताने गावातील अनेक गोष्टी ऐकायला मिळतात. अशाच प्रकारची सुरुवात या कथेची झालेली आहे. "धुनं धुता धुता आया बायाईच्या गोष्टी बाता व्हतं. त्यानं साऱ्या बायाइले धुनं धुयाले जान आवडे । त्यातल्या त्यात सुनवायऱ्या त धुनं धुयाले जायाले हरकत. काऊन का नदीवर आपल्याच सारक्याच चार दोन बाया भेटत••• त्या सुखदुक्याच बोलत. गावातलं काही नवं समजे• [११] अशा प्रकारे या कथेची सुरुवात होते. संपत्याच्या मुलगीच्या लग्नाची गोष्ट आणि इथून कथेला सुरुवात होते. व संपूर्ण कथा चित्रित केली जाते. "बळी" (अकसिदीचे दाने) या कथेची सुरुवातच अशी नाट्यात्मक स्वरूपाची आहे. पुढील घटना काही विचित्र घडणार, पुढे काहीतरी अपशकून होणार हे जसे आधीच समजते त्याच प्रमाणे या कथेची सुरुवातीची रचनाही अशीच आहे. पुढील अनपेक्षित घटना घडणार हेच सुचित करणारी अशी कथा आहे. कथानकामध्ये धक्कादायक घटना घडते आणि तिच्या सुरुवातीच्या रचनेचा पुढकता देते असेच आहे.

कथानक रचनेच्या बाबतीत प्रतिमा इंगोले यांच्या तीनही कथासंग्रहातील कथा या कहाणीवजा अशाच आहेत. वास्तवाशी काही प्रमाणात एवढयासाठीच म्हणावे लागते ते म्हणजे इंगोले यांचे कथानकरचना कसब "लेक भुईची" या कथेमध्ये एकवटलेले आहेत. त्यांच्या या कथासंग्रहातील पहिलीच कथा ही गोष्ट स्पाने सांगितली आहेच व कथेच्या शेवटी जो उपदेश केला आहे की, कथा ही ऐकण्या-साठी असते म्हणून घडविलेली (सांगितलेली) जाते. असाच सूर त्या कथेमध्ये जाणवतो. इतर कथा या ग्रामजीवनातील वास्तव जीवनाचे चित्रण करण्यास यशस्वी झाल्या आहेत. घडलेल्या घटनांचे कथन चढत्या क्रमाने केलेले आहे. जशी कथा घडत गेली आहे तशीच ती चित्रित केली आहे. परंतु "सपन" (लेक भुईची) या कथेतील रचना जाणिवपूर्वक केली आहे असेच त्या एकंदर कथेचा शेवट पाहिल्यास समजून येते. त्यामध्ये समाजसुधारणा हा हेतू असावा असे कथेने वाचन झाल्यानंतर वाटते.

त्याच्या कथारचनेचा महत्वाचा भाग म्हणजे कथेची रचना शेवट पासून कथा सांगण्यास सुरुवात होते आणि कथानक पुढे सरकत जाते आणि अपेक्षित असाच शेवट करते. असाच त्यांच्या कथेचा साचा आहे. वास्तवरूपाने आलेल्या या घटनांचे कथन तेवढेच उत्कठांपूर्वक मांडण्यात इंगोले यांना ब-यापैकी यश मिळाले आहे. याचबरोबर आत्मानुभूती व आस्था यासोबतच लेखिकेने राखलेली अलिप्तताही प्रत्ययास येते.

ब) व्यक्तिचित्रण :

प्रतिमा इंगोले यांच्या कथासंग्रहाच्या अनुषंगाने त्यातील व्यक्तिचित्रण पध्दतीचा विकास करावयाचा आहे. प्रतिमा इंगोले

यांच्या कथांमधून मानवी मनाचे आंतरिक व बाह्य दर्शन घडविणारे आहे. त्यातून माणूस शोधण्याचा प्रयत्न त्यांनी कथांतून केलेला आहे. प्रतिमा इंगोले यांच्या कथेतील व्यक्ती ह्या समाजात व जीवनात आलेल्या अनेक अडचणींना निमूटपणे सामोरे जातात. प्रसंगी त्याविरुध्द संघर्षही करतात. ग्रामीण भागातील स्त्रिया, शेतकरी, अधिकारी उपेक्षित लोक यांच्या स्वभावाचे अत्यंत सूक्ष्म व प्रत्ययकारी दर्शन घडवितात. यावरून प्रतिमा इंगोले यांचे ग्रामीण जीवनाचे, संस्कृतीचे, परिसराचे, मानवी भाव-भावनांचे, मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण आढळते. ग्रामीण समाज कुटुंब संबंध त्यांच्या चालिरिती यामध्ये त्यांची होणारी कुचंबणा, भावनिक कोंडमारा इत्यादीतील तपशिल त्या देतात.

प्रतिमा इंगोले यांनी आपल्या आयुष्यात जी वाटचाल केली या वाटचालीमध्ये जे ग्रामीण जीवन पाहिले, ज्या व्यक्ती पाहिल्या त्यांचे चित्रण केलेले आहे. परिस्थितीने गांजलेल्या व्यक्तींची मने, त्यांचे स्वभाव त्यांनी जवळून अनुभव आलेले आहेत. ही माणसे जगताना वाटयाला आलेली दु:खे निमुटपणे सहन करणारी वाटली. प्रसंगी स्वत:च्या नशीबाला दोष देणारी त्यांच्या व्यक्तिचित्रणातून सामाजिकतेबरोबर माणसाचे मन व उत्कट भावना याचा आविष्कार दिसून येतो.

प्रतिमा इंगोले यांच्या बहुतांशी व्यक्तीकेंद्री आहे. प्रसंग प्रधानता, सामाजिक समस्यावर भर देणा-या आहेत. सामाजिकते-बरोबर व्यक्ती स्वभावविशेष यावरही लेखिकेची दृष्टी असलेली दिसून येते. त्यांची व्यक्तिचित्रणे ही प्रतिमातून निवेदनातून, संवादातून साकार होतात. त्यांची व्यक्तिचित्रणात आढळणारे विशेष आता

लक्षात घेऊ.

काही कथातून व्यक्तीचे प्रत्ययकारी चित्रण करतात. उदा. "मायमका" (लेक भुईंची), आजीचे प्रत्ययकारी व्यक्तिचित्रण साकार केलेले आहे. या कथेमध्ये पांदढी आजी समोर उभी करण्याचे कसब त्याच्या लिखानातून दिसून येते. हया चित्रणावरून समजून येते.

"पांदढी आजी एक पाचन्या हड्डीची बाई । हया उच्चीपुरी । रुपाले पांढी फटक । सर सर नाकाचा सर । कपायावर ढब्बु पयशा एवढा कुकु । आन आंगावर बावनतोयी सोन्याचं लेन । नाकात नथ, कानात पानबाया, बुगळ्या आन कडकू भागात भांगटिका । गयात वजरेटीक, पुतयाचं गाठलं, आन दशावतारी गाठलं हातात. तोये आन अट्टासे । पांदढ्या आजीचं हे हमेशाचं रूप." [१२]

प्रतिमा इंगोले यांनी आजीच्या रूपाचं हुबेहुब चित्रण केले आहे. की, समोर आजी उभी आहे एवढे वास्तव चित्रण त्यांनी आपल्या कथेत केले आहे. आजीच्या रूपाचे ज्याप्रमाणे वर्णन सुक्ष्मपणे केले आहे त्याच प्रमाणे तिच्यातील गुणांचेही चित्रण केलेले आहे. आजीला असलेला इतरांचे आकर्षणत्याच प्रमाणे आजीची वागण्या बोलण्याच्या पध्दतीवरही लक्ष वेधले आहे.

आजीचे व्यक्तिमत्व रेखाटताना इंगोले यांनी आजीच्या सर्वगुणांवर लक्ष केंद्रीत केले आहे. आजी स्वत: सावत्र आई असूनही सावत्र आईसारखी वागली नाही तर तिच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलांनासमजते की, ती आपली सावत्र आई होती. सावत्र आई म्हणून अशी व्यक्तिरेखा दुर्मिळच असते आणि अशा दुर्मिळ व्यक्तीच्या कलागुणांसह त्यांनी या कथेत त्याचे व्यक्तिमत्व उभे केले आहे.

"वटी" या कथेतील पुंजी मांगणीची व्यक्तिरेखा आणि मनावरील आघातामुळे तिच्या वागण्यातील बारकावे टिपले आहेत. तरुणपणीच नवरा वारल्यामुळे समाजाच्या ठोकरा खायची सवय लागलेल्या पुंजीला ठेच लागते त्यावेळी ती म्हणते, "बोटाला आणि मनालाही याची सवय झाली आहे." दारिद्र्याने आणि विधवेच्या शापाने भोगाव्या लागणाऱ्या दुःखामुळे शिळे अन्न मिळालेली समाधानी असलेली पुंजी म्हणते, "सतरा नवऱ्यांची बायको होण्यापेक्षा आणि सतरा लोकांच्या लाथाखाण्यापेक्षा एकाचे दनके खाने परवडते." अशा स्वभावाची असलेली पुंजीचे व्यक्तिमत्व या कथेतून प्रकट होते.

पुंजी बाजीकडली कामे सुटल्यानंतर भुकेच्या प्रश्नाने व्याकुळ झालेली असते. हक्काचे घर म्हणून ती बाजीकडे धान्य मागायला येते. परंतु दारिद्र्यानेही तिच्यातील मानुसकी आणि तिचे मन धाडस करीत नाही. एकीकडे भुकेने मुलांची झालेली अवस्था आणि दुसरीकडे तिच्या मनाची झालेली अवस्था यातून अचूक टिपली आहे.

"सपन" या कथेतील विमलची व्यक्तिरेखा चित्रित करताना लग्नापुर्वीची व्यक्तिरेखा आहे.

"पोरगी दिसाले साजरी हाये. कामाधंद्यात हुशार आहे आन सोभावानबी साजरी हाये. आता तुले काम सांगा लागते. तुचा पायनीतलीच हाये. आत्ता म्हणतात फुई तशी भाशी आन घडली काशी । त्या शिकलेली हाये" जशी डागत सयेबाले पायजे आन शोभते तशीच हाये." [१३] ग्रामीण भागात लग्नापूर्वी सर्रास मुलीचे हे हुबेहुब वर्णन येथे केलेले आहे.

"भोंड" (लेक मुंईची) या कथेतील गोकुळीच्या व्यक्तिमत्वाचे विविध पैलु मांडले आहेत. "वंशाला दिवा म्हणून मुलगा पाहिजे ह्या समाजरुढीपरंपरेने चालत आलेल्या प्रथेमुळे" गोकुळीला पाच मुलींच्यानंतर मुलगा होतो. त्यासाठी तिला करावे लागणारे उपासतापास व देवाला नवस या सर्व व्यापातून तिचे श्रध्दाळू मन प्रकट होते. त्याचबरोबर एकुलत्या एका मुलाचा झालेला अपघात त्यामुळे गोकुळीची अवस्था आणि मुलाच्या मृत्यूने ओढवलेल्या प्रसंगाने झालेली अवस्था अशा गोकुळीवरील प्रसंगाने झालेली तिच्या मनाची अवस्था प्रत्ययकारीपणे चित्रित केलेली आहे. "इकडे नागोची माय ह्याचा अंगारा लावू का त्याचा अंगारा लावू करतच व्हती. तिनं तसंच लेकराले उचललं आन छकड्यात यिवून बसली. इकले त तिच्या डोयाचं आसू खंडेना । पन आसू पुसत लेकराले मांडीवर घिवून बसली. छकडं चालाले लागलं तस त्याच्या हिसक्या हासक्याने नागोनं डोये उघडले आन तो टिकीमिकी पाहाले लागले. "पाय व कसं गुणाचं लेकरु हाये एवढ मांडीवून पडलं पन हू नायी करत ना हा नायी करत म्हनूनत म्हनतेत दुक सोसे लेकरु अन मुक सोसे वासरु." [१४] या सारख्या प्रसंगातून गोकुळीची व्यक्तिरेखा मांडण्यात इंगोले यशस्वी झाल्या आहेत. "परायाची लेक" (लेक मुंईची) या कथेतील केसरला भोगाव्या लागणाऱ्या दुःखाचे आणि त्यामुळे तिच्या मानसिक स्थितीचे चित्रण केलेले आहे. तिच्या मनाची अवस्था प्रभावीपणे अवस्था या प्रसंगातून दिसून येते." केसरला हुबड्यावर हुंबकाने दाटून आले लागले ते खोसा खोसा पान्यानं लडाले लागली."[१५] केसरला भोगाव्या लागणाऱ्या दुःखाची जाणिव स्पष्ट होते.

"डोयाचा खेप" (लेक भुईची)

मुक्या जनावरावर प्रेम करणाऱ्या ग्रामीण माणसाचे हे वर्णन आहे. व्यक्तीच्या पेहरावावरून त्याची मोजमाप न करता त्याच्यातील माणूसकी किती महान आहे यावर ठरते अशा एका ग्रामीण वृध्दाचे हे चित्रण आहे. तो दिसायला कसा दिसतो हे दुसऱ्या बायकांनी केलेले वर्णन आहे.

"बुढा दिसेई तसाच मयका। कमरेलोग धोतर तेई मयकं। आत बारकसी तेई ममकी । डोक्याले पागोटी तेई मयकी । पन सरपाच्या येटोईवानी गुंडायेल... गोल गोल । आन वया पडेल तोंड तेई उना तानानं मयकं व्हयले । त्यानं त आमाले पक्कच वाटलं का बुढ्याची गत." [१६] प्रतिमा इंगोले यांनी विदर्भातील ह्या वृध्दाची केलेली पाहणी आदी हुबेहुब आहे. बुढ्याच्या पेहरावा बरोबरच त्याच्यातील गुणांचाही येथे नमुना दिला आहे.

खाटक्याकडून गाय घेताना त्याच्या व्यक्तीमत्वाची पारख होते. कारण ग्रामीण कृषी देवत म्हणून शेतकरी गायीकडे पाहत असतो आणि हीच गाय खाटक्याच्या हातात पाहून त्याच्यातील शेतकरी जागा होतो आणि ती गाय तो स्वत:साठी घेतो. यावरून बदलत्या कपाटी ग्रामीण जीवनात वरून दिसणारे हे मळके व्यक्तिमत्व आतून किती स्वच्छ आहे याचाच अनुभव येथे येतो.

व्यक्तीच्या हुबेहुब रूप चित्रणाबरोबर व्यक्तीच्या अंतर्मनाचे, स्वभावाचेही चित्रण त्यांनी काही कथांतून केलेले आढळते. व्यक्तीच्या मनाचे अंतरंग ते आपल्या काही कथातून चित्रण करतात. उदा.

"डुबतीची पावल" (लेक भुईंची) :

वडिलांच्या दारिद्र्यामुळे हुंडा देण्यास पैसा नसतो त्यामुळे सिताबाईचे लग्न पुढे ढकलत जाते आणि त्यासाठी तिच्या वडिलांची झालेली धावपळ ती पहात होती आणि ती आतल्या आत काळजीत होती. तिच्या मनाची चाललेली रुखरुख अचुक टिपली आहे. हे पुढील चित्रणातून जाणवते. "सिताबाई बापाची दमछाक पायत पायत व्हती. मुक्या मुक्या कळत व्हती. बाप आधीच कावूलबावूल झालता. ह्यात तिच्या लग्नाची लगनाची कायजी."[17] हे तिच्या हावभावाच्या चित्रणावरून आलेल्या परिस्थितीची चटकणा जाणिव होते. तर "दिठ"(लेक भुईंची) या कथेत मुलाच्या दु:खाने ओढवले-ल्या प्रसंगामुळे स्त्री ची झालेली अवस्था चित्रित केली आहे. त्यातल्या त्यात शेजारणीने दिलेल्या दु:खाची डागणी यामुळे तिच्या मनाची अवस्था आणि दु:खाचे बारकावे टिपले आहेत. "काय व बघ्याड हायेस काय तुन कदी ई यात आपली मुचमुच लळतच । ति-हा हालाचा बेहाल झाला पन तिच्या डोक्स्यात उजीड पडत नाही. आरता झाली का उमर तुची ? का ति-हा आता कामाचे पांदढे झाले ? यावरून तिच्या मनाची अवस्था आणि तिच्या दु:खाचे स्वरूप लक्षात येते. (दिठ) "लेक भुईंची" या कथेमध्ये शेजरच्या बाईंनी तिची समजूत काढली आहे.

"गदी" या कथेत बापू गुरूजींच्या घडणाऱ्या वृत्तींचे दुस-या-साठी मेहनत घेणारे आणि गावच्या विकासासाठी धडपडणा-या बापू गुरूजींचे व्यक्तिचित्रण या कथेत रेखाटले आहे. अनेक प्रसंगातून साकारलेले एकूनच त्यांचे व्यक्तिमत्व आणि व्यक्तिमत्वाच्या विकासाची चढती कमान दाखविली आहे. त्याचप्रमाणे विकासाच्या

आड येणाऱ्या व्यक्तीमुळे आपल्या मनासारखा विकास होत नाही ही दुःखी मनाची अवस्थाही या प्रसंगातून दिसून येते. "गुरूजीले मातर ह्या गोटीचं दुःखू होत होतं. त्याईच्या भल्या मोठया कपायावर दुःखाच्या रेघा उमटत व्हत्या. मायच्यावानी त्याईचा जीव अंदरल्या अंदर लोये तोडत व्हता. त्याईले वाटे चाल व्हयरे पोरा अन वयरे ढोरा असीच या लोकाईची गत हाये, आपलं भलं कामच्यात हाये, हे ही या लोकाईले काऊन कयत नसीत ? आता मातर कदी कदी त्याईले इरल्यानी वाटत राये." [१९] यावरून त्यांच्या कथेतील पात्रे परिस्थितीनुरुप बदलणारी आहेत हे दिसून येते.

काही कथांतून वऱ्हाडी माणसाचे स्वभावविशेषही चित्रित करतात. प्रतिमा इंगोले यांच्या व्यक्तिचित्रणाचे विशेष पाहता इंगोले आपल्या कथांतून व्यक्तींच्या बहिरंगाबरोबर अंतरंगाचेही चित्रण करतात आणि त्यातून त्या व्यक्तिंच्या मनाचे आणि स्वभावाचेही दर्शन घडवितात. त्यांच्या कथेतील पात्रे परिस्थितीनुरुप आलेली दुःखे निमुटपणे भोगतात आणि प्रसंगी परिस्थितीनुरूप बदलणारीही आहेत. त्यांच्या कथेतील व्यक्ती प्रसंगातून, प्रतिमातून संवादातून, निवेदनातून साकारताना दिसतात.

क) <u>प्रसंगचित्रण</u> :

प्रतिमा इंगोले यांच्या कथासंग्रहातील कथांतील प्रसंग हे ग्रामीण जीवनातील तेथील एकंदर वास्तव साकार करतात. असे प्रसंग कथेमध्ये उभे केले आहेत. ग्रामीण जीवनातील सुख, दुःखाच्या प्रसंगाचे आणि घटनेचे चित्रण केलेले आहे. एखाद्या प्रसंगाने संपूर्ण कथाच नजरेसमोर

उभी राहवी एवढा प्रसंग त्या सहज उभ्या करतात. "बि-हाड" (सुगारनचा खोपा) या कथेतील हा प्रसंगच सर्व काही सांगून जातो. डॉक्टरणीनं डबा चोरीच्या आक्षेपाने झालेल्या पंचफुलीच्या आयुष्यातील बदल दिसून येतो. "आज डब्बा हरोला, सकाय आखीन काही हारालांत आपल्यालेच म्हणातीन. त्यापरस आपून आपल्या घरात जाऊ."

"अव ! त्याले छप्पर नासी. कुडनायी दिवसभर या सामाइनाचं कोन राखण करीन ? तू भांड्याले जातं. मी कामाले जातो. मग या सामाइनाच्या जवळ बसीनच कोन...?" २०

या प्रसंगावरूनच त्यांच्या परिस्थितीबरोबरच त्यांची प्रामाणिक जगण्याची जिद्द दिसून येते. या एकाच प्रसंगाने कथेमधील सर्व आशय समजून येतो.

"सोन्याचा गोफ" (अकासिदीचे दाने)

या कथेतील प्रसंगाने ग्रामीण स्त्रीला असणारी अकारण भिती वाटते. या प्रसंगाचे चित्रण केलेले आहे. आपल्या वडिलांनी आपल्याला दिलेला सोन्याचा गोफ आपण आपल्या ननंदेच्या लग्नात दिला व आपल्या घराची इज्जत वाचविण्यासाठी दिला म्हणून वडिल काय म्हणातील या भीतीने तिची झालेली अवस्था या प्रसंगाचे चित्रण केले आहे. "माये पाय लटलटाले लागले, आन् मी खांबाच्या नेटानं उबी रायली.

तितक्यात बापू तथीसा आलेच.... माया डोयातले आसं पावून मले म्हणात......

"बाई । लव्हत काहाले ? अव । आज त मले तुचं मुशान वाटल ।....

अस म्हणून बाप्पू माया डोक्सातून हात फिरीत व्हते... आन् म्या खाली मान घालून व्हटघट्ट मिटून घेतले व्हते." [२१]

या प्रसंगातून वडिल आपल्याला बोलतील आणि आपण आता वडिलांना काय उत्तर द्यावे अशाच प्रसंगाचे हे चित्रण अगदी हुबेहुब केले आहे.

"इनवासे" (सुगरनचा खोपा) :

ग्रामीण भागातही दुसऱ्याला दुःख देण्यात कशी धन्यता आणि आनंद मानतात त्याचे चित्रण केले आहे. परंतु अशा प्रसंगातून तोडगा कसा काढला जातो याचे उत्तम उदाहरण येथे दिले आहे. निनावी पत्राने निर्माण झालेले गैरसमज दूर करण्यासाठी ते पत्र बुलबाई परबतरावांना देतात आणि परबतराव ते पत्र बघून सांगतात हा प्रसंगही तेवढयाच समरतेने चित्रित केला आहे. "बाई, अशा गोठी होतच असतात त्येच्या इकडे कानाडायनी करा लागते, बाई । मी काय तुले डुबोयीन काय ? अव । तो तुवा लेक हाय पन माहाई त भाचा हायेच का नाई । आन तुया मनात नसीन त मी लगन तोडतोई पण त्या पोरीची नाहक नाचुशी व्हयीन का नायी. आपली लेकबाय तशी दुसऱ्याची । लेकबाय । लोकाईले काय हाये ते त चांगल्याचीई नालस्ती करतेत आन वांगल्याचीई करतेत." [२२] यातून जो प्रसंग चित्रित केला आहे तो ग्रामीण जीवनातील प्रवृत्तीवर प्रकाश टाकणारा आहे आणि या वाईट प्रवृतीलाही लोक कसे सामोरे जातात हे या प्रसंगाने दाखविले आहे.

"भोवांडा" (झुरनचा खोपा) :

ग्रामीण भागातील दुःख, दारिद्र्य याचे चित्रण खास असे केलेले नाही. परंतु ग्रामीण व्यक्तीच्या संवादातून त्याच्या परिस्थितीचे चित्रण केलेले आहे. शाळेतील मुलांना अन्नासाठी भुके-साठी जे भोग भोगावे लागतात त्या प्रसंगाचे चित्रण केलेले आहे. शाळेतील मुलाच्या संवादातून प्रकट होते.

"परल्या ! चालत का बे मारवाड्याच्या वाडीत.... अबे बेज्ज्याच जांब आहेत.... आन भूकबी सुचू देत नाही.... चि-हा पोट जसं तोलते.... आन मायनं भाकरच नायी केली राजा ! चालत काय मंग .... खरंच पिकेल जांब हायेत."

"चाल नं अबे ! मीच कुठी जेवलो, मायायठूल्ला त समपाकच हुयाच होय. आताच ते बाप्पूनं जवारी आनली." २३

या विद्यार्थ्यांच्या संवादावरून त्यांच्या दारिद्र्यी परिस्थितीचे जाणीव होते आणि यासाठी इंगोले यांनी संवादामधून प्रसंग चित्रण उभे केले आहे. त्याच प्रमाणे त्यांच्या या भुकेच्या पायी त्यांना वेगळा मार्ग पकडावा लागतो आणि "भांवांडा" पूर्ण करावा लागतो. याचे चित्रण त्यांच्या कथेतून आलेले आहे.

"डुबतीची पावलं" ( लेक मुंईची) :

या कथेतील लग्न हे आर्थिक परिस्थितीमुळे मोडले आणि त्यामुळे उद्भवलेल्या प्रसंगाचे चित्रण प्रतिमा इंगोले यांनी अचुक केले आहे.

"आन आठच दिसात गोठ समजली रामरावाच्या लग्नाची ।
जनकरावानं कपायी धोंडा मारुन घेतला आन सीताबाईंच्या डोमाले पनाया लागल्या. रामारावानं लेकरु हुयाच्या आदी त काय पन लगन हुयाच्या आदीच सीताबाईले टाकून देलतं. टाकून देल नायी त काय ... लोकाईंच्या मनानं त तिचं कुकू झालतं. म्हणाजी अरध लगन झालतं आन दे रामारावची नवरी झालती. बिचारी हळूहळू अदमुसी झालती." [२४]

या प्रसंगचित्रणातून रुढीमुळे स्त्रीच्या वाटयाला कसे दुःख येते याची जाणिव होते.

"मायमाका" (लेक भुईंची) :

या कथेतील आजीने दरोडेखोरांना दिलेल्या लढयाचे चित्रण अगदी वास्तववादी केले आहे.

"तितक्यात दा बारा माणास, वाळयाभवताल जमा झालेय. त्याईंच्या हातात काळया गुप्त्या आन कामीबाची व्हतच ।." [२५] या दरोडेखोरांच्या आगमनापासून सपूर्ण दरोडयाचे चित्र अगदी अलिप्तपणो मांडले आहे. हा प्रसंग एवढा हुबेहुब आहे की वाचताना आपण स्वत: पाहत आहात एवढे सामर्थ्य या प्रसंगचित्रणात आहे.

"वटी" (लेक भुईंची) :

या कथेतील कथाशयाला समृध्द करणारा प्रसंग, "म्या सातरी आथरली आत वरमाय वरबाप दोघाईंले जिजून ठिवलं तितक्यात कोणीतरी डागतरले आनाले गेलं कोनीतरी म्हणो त्या दोघाईंले निंबू पानी

द्या. आता तथी कुठ निंबू पावावं ? माया घरी निंबू व्हतयं. तेच आनावं म्हणूण मी घरी निघाली त गाव आजून नवरदेवातच गुग व्हत. गमती गमतीनं आन घोयक्याघोयक्यानं नवरदेवाचं नवल बोलत व्हतं. कसायाला गाय इकावी तसी आज गावातली एक पोरगी इकली गेली व्हती. आन गाव फटाक्यात गुगल व्हत. फटाक्याईचा चमचम चांदन्याईनं भुललं व्हतं. त्येचावरच खुश झालं व्हतं. तेच बोलत व्हत." [२६] या प्रसंगात कथेतील दु:ख, दारिद्र्य, रूढी वैभवाला भुललेले लोक आणि मुलीच्या आयुष्याची झालेली वाताहत एका प्रसंगातून दिसून येते.

"भोंड" (लेक मुईची):

या कथेत नवसासायाने पाच मुलींच्या पाठीवर झालेल्या मुलाचा अपघात होतो आणि या प्रसंगाचे केलेले चित्रण "आन खियाच्या नादात आन या बयाबयाच्या सयपाकात गुतेल दुर्गीच ध्यान गेले ते नागो खेचतं खेचतं पार पेंडावर शेल्यावर गेला व्हता. त्याच्या खिशातला भवरा पडला आन तो गळगळत निघाला तसा नागो त्याच्यामागं त्याले ध-याले निंगाला ते नि-या पंडाच्या काठावर गेला दुर्गीले ते दिसतात तिनं कल्ला केला त्या कल्ल्यानं ठायेकच नागो थेदरला आन घायबरून खाली पडला." [२७] या प्रसंगाचे चित्रण अगदी उत्कंठावर्धक असूनही कुठेही अवास्तवता नाही.

"कोळलीढन्न" (लेक मुईची) :

या कथेतील ग्रामीण भागातील शेतक-यांची लुबाडणूक करणारे अधिकारी आणि त्यांच्या वाट्याला येणारे नैराश्य यामुळे त्यांच्या

देवावरील विश्वास कसा उडाला आहे हे पुढील प्रसंगातून दाखविले आहे.

"अरे ! परश्या काहाले देवळात जात ने ! अबे ! मानबाईत मानुसकी रायली नाही. नदीत पानी रायल नाही, आन देवळात देव रायला बे ? यथी मलाच्य आटले. वाळून कोळ झाले तथी देव रायतेई बे ?" [२८]

"भिंगरी" (सुगरनचा खोपा) :

ग्रामीण जीवनातील सुख दु:खाच्या चित्रणाबरोबरच प्रतिमा शोले यांनी ग्रामीण भागातील आसपासातील भांडणाचेही चित्रण केलेले आहे. भिंगरी या कथेत चुलत्याच्या भांडणाचे चित्रण केले आहे. शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागात जागेचा प्रश्न काही प्रमाणात भेडसावतो आहे. ग्रामीण भागातील मालकीतील वाटणीला आलेले घर आणियातूनही अतिक्रमण करणारा चुलता यामुळेच भांडणाचे चित्रित करत असताना याच भांडणाला शेवटी कसे उग्रस्म धारण होते ते या प्रसंगात चित्रित केलेले आहे. कुत्र्याच्या निमित्ताने भांडणास सुरुवात होते व भांडणाचे रूपांतर मारामारीत होते. "पाणीदार दुधावाल्याचे पाणीदार बोल ऐकताच तिने रक्तभरल्या नातीला सोडले व ती मध्ये पडल . मुलांना जबरीने ओढू लागली. समजावू लागली. कसेबसे ओढत आणून तिने त्याला घरात ढकलले व घराला बाहेरून साखळी घातली. मुलगा आतून दारावर दार उघड म्हणून धक्का देत होता, शिव्या घालत होता. चुलत्याबरोबर तिचाही उद्दार करत होता." [२९]

"वटी" (लेक भुईची) :

या कथेतील अंधश्रद्धेच्या ओझ्याखाली अजूनही ग्रामीण स्त्री

शाहरी सुशिक्षित म्हणाकून घेणारी स्त्री शेजारणीच्या मुलाच्या मृत्युनंतर कशी वागते याचे इतर बायकांच्या संवादातून तो प्रसंग दिसून येतो.

"असं काय ? मग लयच दिसते व कवूतकाळी । सोना करनाटकी असेन म्हणून त तिले मरम गेला असा ।"

नायी वं ते त साजरी शिकेल हाये. शेयरातली हाये."

शिकेल असली आन शेयरातली असली म्हनून काय झालं, मग सपानाची तिचं । लयच आडपडद्याची हाये म्हनून त तिले वाटलं का हे वली बायातीन आन लेकरू गेलं हुथ ? आपल्या लेकराले तिची दिठ झाली त ?" [३०]

"लेक भुईची" (लेक भुईची) :

या कथेतील प्रसंग चित्रण एवढे प्रत्ययकारी झाले आहेत की, स्त्रीवर होणाऱ्या अत्याचाराचे, अन्यायाचे बळी झालेल्या ग्रामीण स्त्रियांचे या प्रसंगात स्वरूप लक्षात येते.

"बाई । कोन नेलं तुमच्या सुनीले ?
तुमी लवू नोका. माये बाबा आले का माया बाबाले तुमच्या सुनेले आनाले लावतो.। तसी त्या बाईनं झाडनी देली. म्हणे,
"जायी जी बायजाई । आता तिक्के आनुन काय उपेग ? ते काय आता सुदी रायली. ते त आपल्याले आजच मेली." [३१]

"पांग फिटला" (अकसिदीचे दाने) :

या कथेत विठ्ठल पाटलाच्या बहादुरीच्या प्रसंगाचे चित्रण केलेले आहे. क्रांति साप आल्याने साप आणि विद्यार्थी यांची झालेली

तारांबळ याचे चित्रण केले आहे.

"एक दिस आमच्या वरगात साप निघाला. हया मोठ्ठा जात-वान आन कावाकवा भोर ! जसा लप लप करे. "सरप ! सरप !"

सारे पोट्टे कलमा कराले लागले. पन माराले कोनीच डबं रायेना. आमचे दोघबी मास्तर हात बांधून उठले. सरप आपला भीती-भीतीनं सरकतच व्हता. इठ्ठल उठला आन ठेवबा वधरला मास्तरचा त्यानं उचलला तेढलोग सरप भीतीच्या भगदाडात घुसला. तथीच मामुजीच्या नयाबी व्हता. पायता पायता तो पुरा घुसला. त्याची शेप तेवढी बाहीर रायली. मास्तर म्हणे,

"रावू द्या रे, जाऊ द्या त्याले !"

आता ता जाईन त कुठी जाईन ? आन नयात गेलाबी त तो कधीई बाहीर निंगाचा थेव होताच. आमी सारे त्या वर्गातच झपो. पन तितलयात इठ्ठलनं धरली त्याची शेप आन् पूरा बाहरी वढला. आन् रूमानं ठेचला." [३२] हा प्रसंग विस्ताराने सांगितला कारण या संपूर्ण प्रसंगात साप आल्याने जी धावपळ होते तीच चित्रित केलेली आहे. आणि हा प्रसंग एवढा कुमाने मांडला आहे की या प्रसंगाने "चास्ता सागर" यांच्या "नागीन" कथेतील नागाला बापू मारतो त्या प्रसंगाची आठवण येते. "सोन्याचा गोफ" आणि "लोकावानी" (अकसिदीचे दाने) या कथेतील बारीकसारीक प्रसंगातूनही ग्रामीण स्त्रीच्या दु:खाची जाणिव करून दिली आहे.

ग्रामीण जीवनातील आणि एकंदरच परिसरातील दैनंदिन जीवनात घडलेल्या प्रसंगाचे चित्रण प्रतिमा इंगोले यांच्या कथेमध्ये आले आहेत. या प्रसंगचित्रणातून त्यांचे सूक्ष्म आकलन लक्षात येते. ग्रामीण जीवनातील सुख दु:खाच्या प्रसंगाबरोबरच चोरी, भांडण यासारखे प्रसंगही तितक्याच

प्रामाणिकपणे चित्रित केले आहेत. प्रसंगचित्रण करताना कुठेही भाष्य केलेले नाही. उलट कथातून येणारे प्रसंगाचे चित्रण हे कथेचा आशय समृध्द होण्यास सहाय्यभूत ठरते.

## आटोपशीरपणा :

प्रतिमा इंगोले यांच्या कथा लेखनाचे नोंद घेण्यासारखे वैशिष्टय म्हणाजे कथेतील आटोपशीरपणा. पाल्हाळ, कंटाळवाणेपणा, भाषण-बाजी यासारखे अवगुण कोठेही आढळत नाहीत. याउलट कथेच्या आशयाची सुस्पष्ट जाणीव व प्रमाणबध्द रचना बहुतांशी कथेत आढळते. कथेच्या प्रारंभीत मुख्य आशय सुचित होतो. "जायीदार पडदया आणून मी तो सोवळा पायत व्हती. आज... आज माया शिवा राजा व्हनार व्हता . जलमभर जे सपन मनात जपलं ते आज पुरं व्हनार व्हत." [३३] त्याचप्रमाणे "लोडलीढन्न" या कथेतील आरंभ "दुबक्या चालीनं यसौता भोई मारोतीच्या मंदिराकडे गेला आन सातीत त्याले उशीरच झाल्ता. कायी केल्या मारु खपेना आधीच यासाली थडीचं पीक नोतं. त्येच्यात म्हागाईनं मालाले उठाव नोता. कराव त कसं करावं ?" [३४]

याच प्रमाणे अनेक कथा या अंत:करण स्पर्शी, प्रसंगामुळे कथा रंगत जाते. "लेक भुईची", "पयस्याची मेख", "भुईधानी" या कथा रचनेच्या दृष्टीने आटोपशीर आहेत. ग्रामीण संस्कृतीवरच्या या कथा एकंदर आटोपशीर असुनही सर्व काही सांगून जातात. प्रथम पुरुषी निवेदन कथेला एक कहाणीच रुप प्राप्त होतातना दिसते. तर काही कथातून तृतीयपुरुषी निवेदन पध्दतीचा वापर केलेला दिसून येतो. "सुगरनचा खोपा" या कथासंग्रहातील "पेटणारे हात", "भिकारी", "बि-हाड",

"लेक मुईची" या कथासंग्रहातील कोडलीढन्न या कथेतही तृतीय पुरुषी निवेदन पध्दतीचा वापर केला आहे. त्यामुळे कथेतील आशयाची मांडणी करताना लेखिकेचे तटस्थपणाचे कौशल्य जाणवते. कथांचे निवेदन प्रवास व-हाडी बोलीत केलेले असल्यामुळे ते अधिकच प्रभावी व प्रगल्भ असेच झालेले आहे.

ग्रामीण परिसर :

प्रतिमा इंगोले यांच्या कथालेखनाचे विशेष पाहताना त्यांच्या कथेत ग्रामीण व्यक्ती आणि ग्रामीण संस्कृती हाच मुख्य विषय त्यांचा कथांचा आहे. ग्रामीण जीवनातील परिसर, संस्कृती, मानवी स्वभाव निसर्ग याचे सूक्ष्म निरीक्षण लेखिकेने घेतले असल्याचे कथेत चित्रित झाले आहे. कथेत चित्रित झालेला ग्रामीण परिसर हा कथेला पूरकसा पोषक ठरणारा आहे. त्यांच्या कथेतील वातावरणहे खेडेगावा-तील त्याच प्रमाणे कृषीजीवनाशी निगडीत असेच आहे. परंतु अखंडित चालणारे जीवन आणि त्या जीवनाची प्रगल्भ जाणीव हा या सर्व कथांचा स्थायीभाव आहे. निसर्गाबिरोबरच ग्रामीण जीवन आलेले आहे. निसर्गाची खास अशी वर्णने यांना त्यांनी फाटा देऊन ग्रामीण व्यक्ती आणि तेथील निसर्ग एकमेव आलेले आहेत. त्यात विभागणी त्यांच्या कथेत झालेली नाही. याचे चित्रण त्यांच्या "डुबतीची पावलं", "मायम्का", "भोंड", "कोडलीढन्न", "डोयाचा खेय" (लेक मुईची) या कथांमधून दिसून येते.

ग्रामीण परिसरात घडणारे राजकारण ही त्यांच्या "अकसिदीचे दाने" या कथेत आलेले आहे, तर पोटासाठी गाव सोडून जात असताना ग्रामीण परिसराचे ज्या प्रमाणे वर्णन येते त्याच

प्रमाणे परिसराचे ज्या प्रमाणे वर्णन येते त्याच प्रमाणे शहरात भोगाव्या लागणाऱ्या हालाखीचे चित्रणही त्यांच्या "भोवाडा" या कथेत आलेले आहेत. "भोवाडा" या कथेतील शहरी परिसर वगळला तर संपूर्ण कथा या ग्रामीण परिसरात घडलेल्या आहेत. त्यामुळे त्या परिसराचे कथेच्या अनुदपच असे चित्रण आलेले आहे. ग्रामीण परिसर आणि त्यांच्या कथा या एकच आहे. ग्रामीण हाच त्यांच्या कथेचा भाग ठरतो.

भाषाशैली :

प्रतिमा इंगोले यांच्या कथासंग्रहातील भाषा आणि शैली विशेष.

"अकसिदीचे दाने" या कथा संग्रहाच्या मनोगतामध्ये त्यांनी भाषेविषयी आपले विचार मांडले आहेत. त्या आपल्या मनोगतामध्ये म्हणतात, "विदर्भातील सामान्यांच्या अभिव्यक्तीची ही अनभिषीक राणी। पण स्वाभाविक अन मिटून पडलेली । म्हणूनच हा कथा-संग्रह निखळ वऱ्हाडी भाषेतून आहे. हे समाधान." [३५] त्यांनी लिहिलेले दोन कथासंग्रह अस्सल बोलीमध्ये आहेत. त्यांच्या एकंदर कथेतील बोली विषयी मुलाटे म्हणतात, "प्रतिमा इंगोले यांच्या कथांमधून वऱ्हाडी बोलीचे आणि कष्टकरी स्त्रियांचे दुःख सातत्याने आणि प्रखरपणे व्यक्त होते." [३६]

ग्रामीणतेशी नाते सांगायचे झाल्यास त्याची जी भाषा असेल त्याच बोली भाषेत ते सांगितले तर ते योग्य वाटते. नाहीपेक्षा शोभे-च्या फुलाचे असते तसेच भाषेचे होते. त्यामध्ये जीवतपणा नसतो. ग्रामीण बोली विषयी आनंद यादव म्हणतात, "कोणत्याही

साहित्याचे मुल्य हे त्या साहित्यातील भाषा प्रत्यक्ष अस्तित्वात आहे की नाही यावर अवलंबून नसून, त्या साहित्यातून त्या भाषेच्या द्वारा जो एकूण मानवी मनाचा पट उलगडलेला असतो जी त्या मनाची मूलभूत स्पंदने तिथे अविष्कृत झालेली असतात यावर असते." [३७] कथेतील बोलीने कथानकाला जो जीवंतपणा येतो आणि कथेतील बोली कोणती असावी या विषयी मुलाटे यांचे मतही महत्वाचे आहे. "बोलीच्या वापरातून अनुभव अधिक परिणामकारतेने प्रकट होऊ शकतो. खेड्यातील माणूस जी बोली बोलतो त्या बोलीतूनच त्याचे अंतरंग अधिक परिणाम कारकतेने व्यक्त होते. तसेच त्या त्या समाजाचे समाजमानस त्याच्या त्याच्या बोलीतून व्यक्त होत असते. या दृष्टीने बघितले तर बोली या खेड्यातील संस्कृतीच्या निदर्शकच असतात. यासाठीच ग्रामीण लेखकांनी तिचा अभिव्यक्तीचे एक प्रभावी माध्यम म्हणूनच वापर केला पाहिजे. [३८] मुलाटे यांचे हे मत ग्रामीणतेचा सांधा जोडण्यास योग्यच वाटते.

भाषाशैलीचा विचार करता त्यांच्या कथासंग्रहात प्रखरपणे जाणवते ती व-हाडी बोली आणि "मुारनचा खोपा" या कथासंग्रहातील कथा निवेदन प्रमाण मराठी व संवाद व-हाडी बोलीत अशा स्वरूपाचा आहे. निरूक व-हाडी बोलीत कथासंग्रह लिहिण्याचा उद्देश असाच आहे की, सर्वसामान्यांच्या मुखातून बाहेर पडणारी ही बोली त्यांच्याच सुखदु:खाचे चित्रण त्यांच्याच बोलीत केले तर ते प्रत्ययकारी होईल. या विषयी आनंद यादव आपले मत मांडतात. "बोलीत लिहिलेल्या साहित्याची वाङ्मयीन दृष्टया काहीही समीक्षा होवो, भाषाशास्त्रीय दृष्टया त्यांच्या माध्यमाचा विविध अंगानी विचार झाला पाहिजे. समाजशास्त्रीय सांस्कृतिक अंगानी, ध्वन्यंगानी, अर्थांगांनी त्या माध्यम-

रूप झालेल्या बोलींचा अभ्यास करून त्यांचे मोठेपणा व अपूर्वपणा पटवून दिले पाहिजे. त्या बोलीचा गोडवा सर्व समाजाला समजून देण्याचे कार्य स्वीकारले पाहिजे. [३९]

ग्रामीण कथा वाङ्मयात भाषेला अतिशय महत्व आहे. ग्रामीण समाजाचे इतर भाषीय लोकांबरोबर असलेली सर्व त-हेची देव-घव यामुळे भाषेत नकळत परभाषीय शब्दाचा उल्लेख आढळतो व ते नेहमीच्या सवयीने व्यवहारात रूढ होतात. त्याचे परकेपणा जाणवत नाही. (व-हाडप्रांताजवळील भाग हा हिंदी भाषिक पट्टा चालू होतो. त्यामुळे व-हाडी भाषेत काही हिंदी शब्द आले आहेत. उदा. मालूम, कोशीस, लाम हे..., दोन हे ।.. मॉ इत्यादि.)

प्रतिमा इंगोले यांच्या कथासंग्रहातील ग्रामीण बोली आहे. ती प्रामुख्याने व-हाडी बोली आणि या ग्रामीण बोलीतच त्यांनी आपले दोन कथासंग्रह लिहिले आहेत. "लेक भुईची", "अकसिदीचे दाने" यामध्ये संपूर्ण कथा व-हाडी भाषेत आहेत तर "सुगरचा खोपा" या कथा संग्रहातील कथा ह्या निवेदन प्रमाणभाषेत आणि संवादासाठी व-हाडी बोली अशा स्वरूपाचा कथासंग्रह आहे. व-हाडी बोलीचा उठसकेदारपणा आणि त्या भाषेतील अंगभूत असलेल्या वैशिष्ठ्यांसह ती भाषा त्यांच्या कथेमध्ये आलेली आहे. बोली भाषेत संवाद मांडल्या-मुळे व्यक्ती, प्रसंग, घटना यांचे चित्रण वास्तवात येते. त्यामुळे संवादासाठी बोली भाषेचा इंगोले यांनी वापर केला आहे. बुढयाचे आणि खाटक्याचे संवाद जसेच्या तसे दिले आहेत. उदा. "बुढा खाटक्याले म्हणात व्हता, "राम रामजी राम राम । कुठीसा चाल्ले पाव्हने ? "ये टाकलो आबाजी । हमारा जावई हे वो । "गाय इकत घेतली वाटते ?"

"हो जी । वो बाभलीकें तेलीने बेची ।"
"आरता ही गाय वागवाल काय जी ।
मल्ली मस्त हाये राज हो ।"
"पालेगा कौन ? हम तो पडे कसाई । अब शुकरवार का मोर्चा पूरका बझार है ना।"[४०]

या संवादातून वातावरण निर्मिती सहज होऊ शकली आहे. त्याच बरोबर समोर घडलेला प्रसंग पाहत आहोत असे वाचकाला वाटते. मारवाडी पेरू चोरणा-याला पकडण्यास आपल्या नोकराला सांगतो. "अरे । नाम्या । वा बच्चों को देख । पकड सालेको । जांब चोरते । तसे आम्ही पळत सुटलो. "भागते क्या । तुम्हारे घर आके तुमको पिटूंगा । छोडता क्या ।"[४१]

व-हाडी बोलीत पात्रांचे संवाद वापरल्याने व्यक्तिचित्रण जीवंत तर ठरतेच परंतु पात्राच्या मनाचे व स्वभावाचे दर्शन त्यातून घडते. "डुबकीची पावलं मधील जनकरावाच्या मनाचा आकांत सीमाबाई, म्या तुका गुना केला माय बाई । तुव लगन जोकून ठिवलं चुलता नायी म्हणात व्हता तरी कुकू लाकून ठिवलं, पन तुया डोक्स्यावर अकसिदा टाकल्या नायीत सीताबाई मी बाप हो का कसाई । आन माती घाल माया तोंडात".[४२] तर "पेरणारे हात" (सुगरनाचा खोपा) या कथेतील गुणावंत आबाजी आपल्या धर्माच्या लेकीजवळ बोलता बोलता हा म्हातारा आपल्या खाक जावयाचे दु:खही बोलून दाखवितो. समजून समजून आपल्या लेकीसाठी हे सारे सहन करावे लागते असे तो म्हणातो. हा "धनगोटा" असला तरी पोटच्या गोयासाठी मट मना लागते" या व-हाडी म्हणीत व-हाडी स्वभाव विशेष प्रकट होतो तर इनवासे या कथेत परबतराव म्हणातो, दुस-याची लेकबाळ आपली समजली की आपोआप तोडगा निघतो. दुस-याचा

विचार करावा लागतो. या परबतरावाच्या बोलण्यातून ग्रामसंस्कृतीस कुण्या एकाची लेक साऱ्या गावची लेक होते. हा ग्रामीण संस्कृतीचा एक भाग आणि व्यक्तीच्या स्वभावाचा उमदेपणा येथे दिसून येतो. तसेच आजच्या एकून परिस्थितीबद्दल आणि सरकारी अधिकारी यांच्या बद्दलची प्रतिक्रिया बोलीभाषेत मांडल्यामुळे ग्रामीण जीवनाचे वास्तव-दर्शन उभे राहते. उदा. "कोंडलीढन्न" या कथेतील यशवंतरावाची प्रतिक्रिया पाहण्यासारखी आहे. "आजकाल असंच आहे राजे हो । हे सरकारी नक्कर भल्लेच उच्ची पट्टीत चहडलो पायलं त तेईं नक्कर असतात पण असी शान दाखोतात जसे तेच पिढीजात मालक आहेत आन् त्याईच्या समोर येणारे त्याईचे नक्कर । त्यात मोठया लोकाईचा तरी आमास्क भिडमुलाजा ठेवतेत. पन गरिबाले त निन्हा आडव्या हातानंच घेतेत. त्यान त मरगट्टी व्हरते बिच्या-याची । आजकाल त गरीबाची दूनियाच रायली नायी. त्याचा कोनीच वाली नायी राजे हो।" [४३]

तरुण मनाचा कोंडमारा झालेल्या परल्याच्या मित्राच्या संवादातून प्रकट होतो.

"शालक्या । लगनगिगन केलं रे ?"

"अरे काहाचं लगन बे । तेवढी फुरसत कोणाले व्हती. आन कोन पोरगी द्यायली असती ? आन कोन पोरगी देली असते ? तूच सांग । वनवाष्याले कोनी पोरगी देतई ?"

"कोणती नक्करी करत व्हतास तू ?"

"अरे । कहाची नक्करी अन कहाचं काय ?

शायरात पोट छिऊन रायनं मोठं कठीण दाये राजा।"

"मग कहाले रायला इतल्या दिस ? आन काय केलं ?"

"अरे । वायल्या पान्याच्या धारीत अडकल्या मानसाले निंगता येत काय बे ?" [४४]

प्रतिमा इंगोले यांनी ग्रामीण वास्तवाचे चांगले आकलन आहे हे त्यांच्या कथासंग्रहातील व-हाडी बोलीच्या अस्सलतेवरून दिसून येते. त्या योगाने येणा-या म्हणी आणि वाक्प्रचार यांचा ठसकेदार वापर केलेला आहे.

"अराबा अन निव्वळ जीवाचा खराबा".
"घर फिरलं कि घराचे वासे फिरतात." ४५
"गरीब देवा लाथा मार खनत्क देवा नमस्कार." ४६
"देव करता मागे खेव लागला." ४७
"फक्त पैसानसला का सारे सोंग आनता येतात पन पयष्याचे सोंग नायी आनता येत." ४९
"शिजल ते पोटात जाईल कस ? आणि चितलं ते होईन कस." ५०
"धिटाई खाचे मिठाई आन गरीब खाये गवाडा."
"हिंडग्याले देलो गाय अन धावू धावू गोठानावर जाये." ५१
"दुक सोसे लेकरू आन भुक सोसे वासरू." ५२

व-हाडी बोलीतील म्हणीच्या वापराने कथेत जीवंतपणा आलेला आहे. एकप्रकारचा प्रसंग समोर उभा करण्याचे सामर्थ्य या भाषेत आढळते.

"पयसेवाल्याचा हेला गाभन, तेरावा महिना!"
"लाथाईचा देव बाताईनं मानतच नसते."
"घेन्न म्हना आता। या हातानं करणं आन् त्या हातानं मरनं."

इंगोले यांनी आपल्या कथासंग्रहात त्याच्या कथांच्या आयशानुरूप प्रतिकांचा आणि प्रतिमांचा उपयोग करतांना बोलीला धरूनच त्या त्या ग्रामीण परिसरातील प्रतिकं परिणामकारक आहे.

"आन नवरीचा बाप भूत झोबल्यावानी आन हिंव भरल्यावानी थर थर कापत व्हता."

"गारपीटीनं झोडपल्यासारकं ते पुरं घरच कावूला-बावूला झालतं."

"लेकरं हायेतई तसेच गुनाचे । कोनासे पटकन उचलून घेवावं वाटतेत ति-हा सोन्याचे तोयेच हायेत. पण मुकाशी रावोत बाबा। की झालं.

"सोनकळा झालेला गहु वा-याने डोलावा तस मन डोलू लागलं."

"आभाया स्मारकं मोठं मन हाये, माया बापूच".

ग्रामीण शैलीचा वापर करण्याचे सामर्थ्य आदी हुबेहुब त्यांच्या लिखानातून दिसून येते. ग्रामीण समाजात सणादिवशी म्हणणारी गाणीही दोन ठिकाणी दिली आहेत.

"आडूसानं मारलं
आ-यानं टोचलं
पु-यान्यानं मारलं
कास-यानं आवरलं
राग नका धरू हो ।
आन स्काय जियालो या ।"

बैलाच्या सणादिवशी खेड्यातील हे वातावरण लक्षात येते.

ग्रामीण स्त्रीच्या मुखातील ही गाणी हुबेहुब दिली आहेत. ही गाणी ग्रामीण स्त्री श्रमात असताना गुणगुणत असते.

"पिकात पिक बाई प-हाटी ऐकली
हिच्या वस्त्रानं दूनिया झाकली."

त्याच प्रमाणे लहान मुलांना खेळवताना त्यांच्याच भाषेत कसे अंगाई गीत म्हणाले जाते याचेही शैलीदार वर्णन केले आहे.

"तान बहुल
पायटी उठलं
उवू लागलं
कांडु लागलं
परोयी मुतलं."

प्रत्येक लेखकाची स्वत:ची अशी खास अशी एक शैली असते आणि त्या शैलीवरून तो लेखक ओळखला जातो. त्याचप्रमाणे प्रतिमा इंगोले यांच्या भाषाशैली विषयी विचार करता म्हणावे लागेल, त्यांच्या भषेतील वाक्यरचना ही छोटी छोटी आहे. आणि त्यामुळे भाषेतील जीवंतपणा जाणवतो. प्रतिमा इंगोले यांच्या कथा या विदर्भातील असल्याने त्या ग्रामीण बोलीने त्यांची कथा समृध्द झाली ती तेथील सर्व गुणासहित प्रकट झाली आहे. संवादातील व-हाडी बोली बरोबरच इतर शब्दही सहज येतात. तेही शब्द त्यांच्या कथेमध्ये प्रकट झाले आहेत.

इंगोले यांच्या कथेमध्ये व-हाडी भाषेतील ठसकेदार पणा आला आहे. भाषेतील म्हणी आणि वाक्प्रचारही योगानेच आलेले आहेत. त्यांच्या कथेतील काव्यात्मता हाही गुण दिसून येतो. ग्रामीण बोली-तील हे सहज गुणगुणणारे अंगाई गीतही त्यांच्या कथेमध्ये आलेले आहे. एकंदरच ग्रामसंस्कृतीचे व जीवनाचे बोलीशी असलेले अतूट नाते सर्वगुणासहीत प्रकट झालेले आहे.

इंगोले यांनी व-हाडी बोली वापरायची म्हणून वापरलेली नाही.

किंवा तिचा वापर एखाद्या वस्तुसारखा न करता त्या भाषेतील सौंदर्य आणि जीवंतपणासह त्यांनी आपल्या कथेत आणली आहे. बोली भाषेला प्रमाण भाषेचे व्याकरणाचे तंतोतंत नियम लावून पारखता येते नाही. ती ओघानेच आलेली असते. उदा. मला तुला अशाआकारान्त शब्दांची रूपे एकारान्त होताना दिसतात. मले, तुले व क्रीयापदे ही याप्रमाणे दिसतात. ठेव-ठेवजो, पहा-पायजो, आण-आणजो, त्याच प्रमाणे जा - जायन, रहा-राहानं, ये-यानं इ.

त्यांच्या कथेतून येणारी नावे सुध्दा ग्रामीणतेशी नाते सा सांगणारी अशी आहेत. उदा. पुंजी, संपत्या, गोकुची, शांक-या, सुकदेव, इठ्ठल, परबतराव, इ. नावे ग्रामीण बोलीतला एक नमुनाच आहे. कथेचा आशय परिणामकारक होण्यासाठी आवाजही जसेच्या तसे आलेले आहेत. या आवाजामुळे एकप्रकारची नादमयता कथेत आलेली आहे. उदा. पायतानाचा आवाज "कुर••• कुर••• म्हशीचं बोम्बलनं सुरुच सबूक ••• सबूक••••" तुरटीच्या जळल्याचा आवाज सुई••• सुईं••• घरातील म्हातारा (बुढा) चहा पिताना होणारा आवाज फुस्क••••फुस्क••••फुस्क करत चहा पीत होता.[६४]

इंगोले यांच्या कथेमधून जाणवणारे सादशब्दही शैलीचा एक भाग बनले आहेत. उदा. डब्बे डुब्बेत, जमीन-जुमला, सोनं-नानं, किडूक-मिडूक, चुया-मुंग्या, कदी-मदी, रहाट-गाळणं इत्यादी शब्द हे शैलीचा एक नमुना म्हणूनही त्याच प्रमाणे बोलीचाच एक भाग म्हणूनही त्यांच्या कथेत आलेला आहे. त्याचप्रमाणे काही नादानुकरणाही आवाजही त्यांनी शब्दात पकडण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यांच्या कथेतील हे वाक्य पाहण्यासारखे आहे. "आपून आपलं

जे जे व्हते ते टूकूटूकू पाहावं आन पातरावर पळलं स मुटूमुटू खावावं.[६५] त्याच प्रमाणो गुळूगुळू, तर रडव्याचा मुयमुय शाब्दबध्द केलेले आहे.

ग्रामीण भागातील शिक्षणाच्या सुविधामुळे आणि इतर परिस्थितीमुळे ग्रामीण भागात इंग्रजीच्या शब्दांचा नेहमीच्या बोलण्यात लोक सहज वापरताना दिसताना त्याचा वापरही इंगोले यांनी आपल्या कथेत केलेला आहे. उदा. हिसटरी, सेवन पी.सी.आर., रिपोर्ट, मिटिंगीत, विलोकशान, बोरडींग, मिल्ट्री, फेडरेशान, इत्यादी इंग्रजी शाब्दांना बोलीच्या वापरात आलेले महत्व व त्यांचे रूळणाही दाखविले आहे.

ग्रामीण भागात व्यापाराच्या निमित्ताने परप्रांतीयांच्या भाषेशी संबंध येतो. त्यामुळे ते रोजच्या व्हसरातही अशा प्रकारची भाषा वापरली जाते. ही भाषा एकतर हिन्दी नसते किंवा इतर दुसरी भाषा नसते. त्यामुळे त्या भाषेला जो एकप्रकारचा वेगळेपणा आहे तो वेगळेपणाही इंगोले यांनी आपल्या कथेत मांडला आहे. प्रतिमा इंगोले यांच्या कथासंग्रहातील भाषेविषयी त्यांची स्वत:ची प्रतिक्रिया काय आहे हेही जाणून घेणो या दृष्टीने महत्वाचे वाटते. त्या म्हणातात, "माझी निर्मिती जेव्हा स्वाभाविक स्वरुपात प्रकट झाली तेव्हा ती निखळ व-हाडी बोलीभाषेत आपोआप प्रकट झाली. कारण त्या त्या कथाबीजाची मागणी तशी होती. ग्रामीण वास्तवकथा लिहिताना त्या त्या बोलीभाषेचा वापर अनिवार्य ठरतो. लेखकाच्या त्या अनुभवाशी स्व-अनुभव असेल किंवा थेट संबंध असेल तर लिहिताना तीच भाषा स्फुटत जाते. पण या स्फुटणा-या भाषेवरच संस्कार लिहितो. म्हटले तरी ती त्याला बदताही येते. माझ्या ब-याच कथा ह्याअशा स्वभाविकपणो स्फुरलेल्या असल्यामुळे मी त्या कथांच्या मागणीनुसार भाषेचा अवलंब केला. बरेचदा भाषा बदलण्याचा

प्रयत्न केला तर त्या कथेतील गंमत निघून जाते हे ही माझ्या लक्षात आले." [६६] व-हाडी भाषेविषयी त्या म्हणतात" इतर कोणताही पुरावा देण्यापेक्षा बहिणाबाईंची गाणी संपूर्ण महाराष्ट्रात पोचली आहेत हे अमान्य करण्यात अर्थ नाही. शिवाय "उपरा" या पुस्तकाचा फ्रेंच भाषेत अनुवाद करण्यास फारशा अडचणी आल्या नाहीत. आपला दृष्टिकोन पूर्वग्रहदुषित नसेल व स्वच्छ असेल तर व-हाडी भाषेतील साहित्य महाराष्ट्रभर पोहचण्यास काहीच हरकत नाही."[६७]

सारांश :

प्रतिमा इंगाले यांच्या कथेतील कथानकरचना, व्यक्तिचित्रण, प्रसंगचित्रण ग्रामीण परिसर, आटोपशीरपणा आणि भाषाशैली हे विशेष पाहत असताना इंगोले ग्रामीण जीवनाची आणि तेथील वास्तवाची प्रगल्भ जाणीव हा या कथेचा स्थायीभाव आहे. कथानक रचनेच्या बाबतीत त्यांच्या कथा या कहाणीवजा झाल्या आहेत. कथेची रचना वास्तवाशी अतुट नाते सांगणारी आहे. म्हणूनच त्यांच्या कथा कथानकरचनेत यशस्वी झाल्या आहेत. त्यांच्या बहुतांश कथा या कधी पुर्वकथन पध्दतीने होते आणि कथेचा आरंभ मध्य, शेवटही आशयानुरूप झालेला दिसून येतो. वास्तव घटनांचे कथन करण्यात इंगोले यशस्वी झाल्या आहेत. काही कथा पात्रमुखाने आत्मनिवेदन करून त्यांचे हे वेगळेपण लक्षात येते.

प्रतिमा इंगोले यांच्या व्यक्तिचित्रणाचे विशेष पाहता इंगोले आपल्या कथांतून व्यक्तींच्या बहिरंगाबरोबर अंतरंगाचेही चित्रण करतात आणि त्यातून त्या व्यक्तीच्या मनाचे आणि स्वभावाचे दर्शन घडवितात. त्यांच्या कथेतील पात्रे ही परिस्थितीनुरूप आलेली

दु:खे निमुटपणे सोसतात आणि प्रसंगी परिस्थितीनुरूप बदलतानाही दिसतात. कथेतील व्यक्ती या प्रतिमातून, प्रसंगातून, संवादातून, निवेदनातून साकारताना दिसतात. व्यक्तीच्या जीवनातील सुख-दु:खाचे रागलोभाचे जसे कथेत येतात त्याचबरोबर चोरीच्या प्रसंगाचे चित्रण, भांडणाचे प्रसंग तितकेच प्रत्ययकारीपणे रेखाटले आहे. प्रसंग-चित्रणात कोणतेही भाष्य न करता घडलेल्या प्रसंगाचे चित्रण तटस्थ-पणे करून प्रसंगातील वास्तवपणा दाखविला आहे. असे हे प्रसंग कथेचा आशय समृध्द करणारे आहेत. त्याचप्रमाणे प्रथम पुरूषी, तृतीयपुरुषी निवेदन तंत्राचाही त्यांनी कथेच्या समृध्दीसाठी वापर केलेला दिसून येतो.

आटोपशीर कथानक आणि त्यातील प्रसंग हे त्यांच्या कथेचे वैशिष्ट म्हणावे लागेल. त्यांच्या कथेने एकचरक असा परिणाम घडून येतो. पाल्हाळ कंटाळेपणा, आणि भाषणबाजी हे अवगुन त्यां-च्या कथेत कुठेही आढळत नाहीत. हे एक कथेच्या वास्तवाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. ग्रामीण संस्कृतीमध्ये या संपूर्ण कथा असून त्यातील अनेक घटनांना फाटा देवून कथेत योग्य असाच साचा निर्माण केलेला आहे. त्याच्या कथेतील परिसर आहे तो ग्रामीण परिसराचे वर्णन त्यांनी कथेच्या अनुषंगाने केलेले आहे. त्यातील व्यक्ती, प्रसंग, घटना, यातूनच ग्रामीण परिसराचे चित्र समोर उभे करण्याचे त्यांचे कसब कौतुकास्पद आहे.

भाषा शैलीच्या बाबतीत इंगोले यांनी व-हाडी भाषेच्या सर्व लकबी कौशल्याने वापरल्या आहेत. व-हाडी भाषेचा जिवंतपणा आहे असाच कथेच्या रुपाने प्रकट झाला आहे. बोलीतील सर्व गुण त्यांच्या कथेमध्ये दिसून येतात. व-हाडी बोली, म्हणी, वाक्प्रचार,

यामुळे कथेला एक प्रकारचा जिवंतपणा आलेला दिसतो. त्याचप्रमाणे भाषेविषयी इंगोले यांची स्वतःची भूमिका काय आहे हे ही समजून घेतली आहे.

-----

प्रकरण तिसरे

संदर्भ


| | | |
|---|---|---|
| १) | इंगोले, प्रतिमा | - "लेक भुईची", "भोंड", वसुधा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, १९९१, पृ.४५ |
| २) | इंगोले, प्रतिमा | - "अकसिदीचे दाने", (अकसिदीचे दाने), मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८६, पृ. ९. |
| ३) | तत्रैव, | - "दारका", पृ. १५. |
| ४) | तत्रैव, | - "गढी", पृ. ३७. |
| ५) | तत्रैव, | - "लोकावानी", पृ. ६१. |
| ६) | इंगोले, प्रतिमा | - "सुगरनचा खोपा", "बिऱ्हाड", साहित्यसेवा, प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै, १९९१, पृ.५. |
| ७) | इंगोले, प्रतिमा | - "लेक भुईची", "डुबतीची पावलं", वसुधा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रु वारी, १९९१, पृ.१. |
| ८) | तत्रैव, | - "डुबतीची पावलं", पृ.८ |
| ९) | तत्रैव, | - "मायमका", पृ. १८. |
| १०) | तत्रैव, | -- "मायमका", पृ. २५. |

११) तत्रैव, - "बंटी", पृ. ३६.

१२) तत्रैव, - "मायमका", पृ. १८.

१३) तत्रैव, - "सपन", पृ. ५७.

१४) तत्रैव, - "मोंड", पृ. ५२.

१५) तत्रैव, - "परायाची लेक", पृ. १६.

१६) तत्रैव, - "डोयाचा खेय", पृ. ८१.

१७) तत्रैव, - "डुबतीची पावलं", पृ. ३.

१८) तत्रैव, - "दिठ", पृ. ७२.

१९) इंगोले, प्रतिमा - "अकसिदीचे दाने", "गठी", मराठवाडा पब्लिशिंग हाउस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८६; पृ. ५२.

२०) इंगोले, प्रतिमा - सुगरनचा खोपा, "बि-हाड", साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुले, १९८९, पृ. १५.

२१) इंगोले, प्रतिमा - अकसिदीचे दाने, "सोन्याचा गोफ", पृ. ५३.

२२) इंगोले, प्रतिमा - सुगरनचा खोपा, "इनवासे", पृ. ७७.

२३) तत्रैव, - "खोवांडा", पृ. ५१.

२४) इंगोले, प्रतिमा - लेक भुईची, "डुबतीची पावलं", वसुधा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, जुलै, १९९१, पृ. ७.

२५) तत्रैव, - "मायमका", पृ. २६.

२६) तत्रैव, - "पयस्याची मेक", पृ. ४४.

२७) तत्रैव, - "भोंड", पृ. ५०.

२८) तत्रैव, - "कोडलोढन्न", पृ. ७१.

२९) इंगोले, प्रतिमा - सुगरनचा खोपा, "भिकारी", साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै, १९८९, पृ.४०.

३०) इंगोले, प्रतिमा - लेक भुईंची, "वटी", पृ. ७९.

३१) तत्रैव, - लेक भुईंची, पृ. ८७.

३२) इंगोले, प्रतिमा - अकसिदीचे दाने, "पांग फिटला", मराठवाडा पब्लिसिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८६, पृ. २८.

३३) इंगोले, प्रतिमा, - लेक भुईंची, "लेक भुईंची", पृ. ८६.

३४) तत्रैव, - "कोडलीढन्न", पृ. ६४

३५) इंगोले, प्रतिमा - अकसिदीचे दाने, "मनोगत", पृ.५.

३६) मुलाटे, वासुदेव - ग्रामीण कथा : स्वरूप आणि विकास, साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जानेवारी, १९९२, पृ.८७.

३७) यादव, आनंद - ग्रामीण साहित्य स्वरूप आणि समस्या, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, तृतीयावृत्ती, १९९३, पृ.१०२.

३८) मुलाटे, वासुदेव - "ग्रामीण कथा", पृ. २४०.

३९) यादव, आनंद - "मराठी साहित्य समाज आणि संस्कृती", मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे-३०, प्रथमावृत्ती, ऑक्टोबर, १९८५, पृ.६४.

४०) इंगोले, प्रतिमा - लेक भुईची, "डोयाचा खेय", पृ. ८३.

४१) इंगोले, प्रतिमा - सुगरनचा खोपा, "मावांडा", साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै, १९८९, पृ.५२.

४२) इंगोले, प्रतिमा - लेक भुईची, "डुबतीची पावल", पृ.७.

४३) तत्रैव, - "कोडलीढन्न", पृ. ६७.

४४) इंगोले, प्रतिमा - सुगरनचा खोपा, "भोवांडा", पृ.५६.

४५) इंगोले, प्रतिमा, - सुगरनचा खोपा, "मिगारी", पृ.३२.

४६) तत्रैव, - "मिगरी", पृ.३२.

४७) तत्रैव, - "मिगारी", पृ.३३.

४८) तत्रैव, - "मिगरी", पृ.३८.

४९) तत्रैव, - "भोवांडा", पृ. ५८.

५०) इंगोले, प्रतिमा - लेक भुईची, वसुधा प्रकाशन,नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, १९९१, पृ.२.

५१) तत्रैव, - "मायमका", पृ. २०.

५२) तत्रैव, - "पयस्याची मेख", पृ. ४३.

५३) इंगोले, प्रतिमा - अकसिदीचे दाने, पृ. १०. मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८६.

५४) तत्रैव, - "दारका", पृ. २७.

५५) तत्रैव, - "सोन्याचा गोफ", पृ. ५२.

५६) इंगोले प्रतिमा - "लेक भुईची","पयस्याची मेख", वसुधा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, १९९१,

५७) तत्रैव, – "भोंड", पृ. ५३.

५८) तत्रैव, – "दिठ", पृ. ७७.

५९) इंगोले, प्रतिमा – सुगरणचा खोपा, "भोवाडा", साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै, १९८५, पृ.५०.

६०) इंगाले, प्रतिमा – अकसिदिचे दाने, "सोन्याचा गोफ", मराठवाडा पब्लिशिंग हाऊस, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, १९८६.

६१) तत्रैव, – "दारका", पृ. १६.

६२) इंगोले, प्रतिमा – सुगरणचा खोपा, "धुईधानी", साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, जुलै, १९८९.

६३) इंगोले, प्रतिमा – लेक भुईची, "दिठ", वसुधा प्रकाशन, नाशिक, प्रथमावृत्ती, फेब्रुवारी, १९९१.

६४) इंगोले, प्रतिमा – अकसिदीचे दाने, पृ. ६२.

६५) इंगाले, प्रतिमा – लेक भुईची, "परायाची लेक", पृ.१३.

६६) रविवारी दि. २४ मे, १९९८, "गाठीभेटी" या सदराखाली हिम्मत शेकोकार यांनी घेतलेली मुलाखत,(पान २.)
दैनिक देशोन्नती – नागपूर.

६७) तत्रैव,

----